**नियमित दरखास्त क्र.५/२०२५**
**श्री. विठोबा नारायण चोचे (मयत) व २**
**वि.**
**श्री. आत्माराम दत्तात्रय टाकळे (मयत) व ४**

**नि. १६ खालील आदेश**

दरखास्तदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दि.प्र.सं.आदेश ६ नियम १७ प्रमाणे दरखास्त अर्जामध्ये ऋणको क्र.१ ब यांच्या नावामध्ये दुरुस्ती करून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. त्यांचे थोडक्यात कथन असे आहे की, रे.दि.मु.नं.९९/२०१८ मध्ये ऋणको क्र.१ब यांचे नाव प्रमिला आत्माराम टाकळे असे नमुद असून हुकूमनाम्यामध्ये सुध्दा तेच नाव नमुद आहे. त्यानुसार दरखास्तदार यांनी तिचे लग्नापुर्वीचे नाव या अर्जात दाखल केले आहे. नि.६ कडील बेलीफ अहवालामध्ये ऋणको क्र.१ब यांचे नाव प्रमिला नसून पूनम असल्याचे सांगितल्याने ते न बजावता परत आले. म्हणून योग्य नावावर नि.१० प्रमाणे पुन्हा नोटीस काढली व तिच्या योग्य नावावर नोटीस बजावून देखील आली. त्यामुळे ऋणको क्र.१ब यांचे नाव प्रमिला ऐवजी पूनम अशी दुरूस्ती करण्यासाठी परवानगी मिळावी.

३. प्रस्तुत अर्जावर ऋणको क्र.१अ व १ब यांनी म्हणणे दाखल करावे म्हणून संधी दिली असता ऋणको गैरहजर. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज ऋणको यांच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात येतो.

४. अर्जातील कथनांच्या अनुषंगाने दरखास्तदार तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. नि.४/१ सोबत याच न्यायालयातील रे.दि.मु.नं.९९/२०१८ चा हुकूमनामा नि.११० दाखल केला. मुळ प्रतिवादी मयत आत्माराम दत्तात्रय टाकळे यांचे वारसांना या अर्जात समाविष्ट केले असून क्र.१ब प्रमिला आत्माराम टाकळे

यांचे नाव नमुद आहे. त्यानुसार दरखास्तदार यांनी त्यास ऋणको क्र.१ब म्हणून या अर्जात समाविष्ट केले आहे. दि.१७.०३.२०२५ रोजीच्या आदेशानुसार ऋणको क्र.१अ व १ब विरुध्द नि.६ नुसार नोटीस पाठवली असता क्र.१ब ही मुलगी असून तिचे नाव प्रमिला नसून पूनम असल्याचे सांगितल्यामुळे क्र.१अ यांना नोटीस बजावून क्र.१ब यांना न बजावता परत आली. त्यानंतर नि.१० कडील अर्जाप्रमाणे क्र.१ब प्रमिला उर्फ पूनम आत्माराम टाकळे या नावाने नोटीस काढण्याचा अर्ज दिल्यावरून बेलीफ अहवाल नि.१२ दि.०३.१०.२०२५ रोजी चुलते यांचेकडे चौकशी केली असता प्रमिला ऊर्फ पूनम आत्माराम टाकळे या कायमस्वरुपी सासरी राहण्यास गेल्या असून सासरचे नाव व पत्ता सौ.रिया राकेश हेगिष्टे, रा.गावेडे, आंबेरे, ता.जि.रत्नागिरी असे समजल्यावर नि.१२ कडील अर्जाप्रमाणे पुन्हा त्या नावावर नोटीस नि.१३ काढली असता दि.११.०२.२०२६ रोजी क्र.१ब स्वत: हजर मिळाले नाहीत. सासरे रविंद्र रामचंद्र हेगिष्टे यांनी नोटीस स्वीकारल्यावरुन दि.१६.०४.२०२६ रोजीच्या नि.०१ वरील आदेशाने दरखास्त अर्ज ऋणको क्र.१अ व १ब विरुध्द एकतर्फा चालविण्यात आला. तरी दरखास्तदार केवळ प्रमिला नावा ऐवजी पूनम या नावात दुरूस्ती करून दरखास्त अर्जामध्ये कोणताही उपयोग होत असल्याचे दिसून येत नाही. म्हणून दरखास्तदार यांनी ऋणको क्र.१ब यांच्या योग्य नावाबाबत तजवीज व दुरुस्ती करणे अपेक्षीत आहे. त्याकरीता पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. दरखास्तदार यांनी ऋणको क्र.१ब यांच्या योग्य त्या नावाबाबत व दुरुस्तीबाबत तजवीज करावी.

**सही/-**

दिनांक – १०/०६/२०२६.

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
चिपळूण

**- प्रमाणपत्र -**

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| न्यायालयाचे नाव | सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी. |
| आदेश घोषीत दिनांक | १०.०६.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | १०.०६.२०२६ |
| आदेश अपलोड केलेले दिनांक | १०.०६.२०२६ |